**नियमित दिवाणी दावा क्र. १२८/२०१९ मधील निशाणी क्र. ४३ वरील आदेश**

( खतिजा बी युसुफ शेख तर्फे वारस वि.विश्राम अंजारा तर्फे वारस)

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादीच्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी ३८ वर झालेला उलटतपास नाही आदेश रद्द होवुन मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी याच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. प्रकरणाचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी दाव्यात पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. प्रतिवादीचा वादी यांना उलटतपासाकरिता प्रकरण ठेवण्यात आले होते. दिनांक २४.०७.२०२५ रोजी वादीचे माहितगार वकील हे नाशिक येथे गेल्यामुळे प्रतिवादीचा उलटतपास घेता आला नाही. त्यामुळे प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश करण्यात आला. वादी यांनी त्यांचे माहितगार वकील नाशिक येथे गेल्याने प्रतिवादीचा उलटतपास घेता आला नाही असे कारण नमुद केला आहे. त्यामुळे प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश झालेला आहे.

०४. प्रतिवादीने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास हरकत नोंदविलेली आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे स्वरुप पाहता वादी यांना प्रतिवादीचा उलटतपास घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच वादीचे दावा चालविण्याबाबतचे वर्तन पाहता सदर अर्ज मंजूर करतांना खर्चा बाबत आदेश करणे न्यायोचित व गरजेचे आहे. त्यामुळे दिनांक २४.०७.२०२५ रोजी वादी विरुध्द प्रतिवादीचा उलटतपास नाही झालेला आदेश खर्चासह रद्द करणे मला योग्य वाटते. परिणामी मी खालील प्रमाणे आदेश पारित करते.

## आदेश

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. दिनांक २४.०७.२०२५ रोजी झालेला प्रतिवादीचा उलटतपास नाही असा आदेश वादीने प्रतिवादीला रक्कम रुपये २,०००/— दिल्यानंतर रद्द करण्यात येतो.

NANAWARE MOHINI DATTATRAY
Digitally signed by NANAWARE MOHINI DATTATRAY
Date: 2025.08.25 12:20:09 +0530

स्थळः— इगतपुरी ( मो. द. ननवरे )

दिनांकः— २१/०८/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

इगतपुरी.